# उपविभागीय अधिकारी अमरावती यांचे कार्यालय,

रा.मा.क्र. ९९ एम.आर.सी - ८१/नांदगांव पेठ./२०१६-२०१७.

अर्जदार: नमन बिल्डींग मटेरियल्स प्रा.लि.तर्फे संचालक सौ. कविता सर्वेश अग्रवाल, रा. चौधरी चौक, कॉलेज रोड, अमरावती ता.जि..अमरावती **नविन नाव** नमन वेन्चर्स प्रा.लि. तर्फे संचालक सौ. कविता सर्वेश अग्रवाल, रा.चौधरी चौक, कॉलेज रोड, अमरावती ता.जि..अमरावती.

**आदेश**

**(आदेश पारीत दिनांक २६/४/२०१७)**

अर्जदार: नमन बिल्डींग मटेरियल्स प्रा.लि.तर्फे संचालक सौ. कविता सर्वेश अग्रवाल, रा. चौधरी चौक, कॉलेज रोड, अमरावती ता.जि..अमरावती **नविन नाव** नमन वेन्चर्स प्रा.लि. तर्फे संचालक सौ. कविता सर्वेश अग्रवाल, रा.चौधरी चौक, कॉलेज रोड, अमरावती ता.जि..अमरावती. यांनी दिलेल्या अर्जानुसार मौजे नांदगांवपेठ, ता.जि. अमरावती येथील शेत सर्वे नं. १७, या शेतजमीनीचे उपविभागीय अधिकारी, अमरावती यांनी पारीत केलेले अकृषक आदेश क्रमांक : रा.मा.क्र.२/एन.ए.पी.-३४/ नांदगांव पेठ भाग-१/२०१५-२०१६ आदेश पारीत दिनांक ८.१२.२०१५ नुसार निवासी प्रयोजनाकरीता अकृषक करण्यात आली आहे.

या अकृषक झालेल्या मौजे नांदगांव पेठ भाग-१, ता.जि.अमरावती भुखंड क्रमांक

| | |
|---|---|
| प्लॉट क्रमांक १-ए क्षेत्रफळ | १३५.२९ चौ.मि., |
| प्लॉट क्रमांक १-बी २-अे क्षेत्रफळ | २७३.८० चौ.मि., |
| प्लॉट क्रमांक २-बी क्षेत्रफळ | १३६.९० चौ.मि., |
| प्लॉट क्रमांक ३-ए क्षेत्रफळ | १३६.९० चौ.मि., |
| प्लॉट क्रमांक ८-ए, ८- बी क्षेत्रफळ | २७३.८९ चौ.मि., |
| प्लॉट क्रमांक ७-ए, ७- बी क्षेत्रफळ | २७३.८० चौ.मि., |
| प्लॉट क्रमांक ६-बी क्षेत्रफळ | १३६.९० चौ.मि., |
| एकुण क्षेत्रफळ | १३६७.४८ चौ.मि., |

या जागेपैकी १६३९.५३ चौ.मि.जागेवर बांधकाम करण्याची परवानगी देण्याबाबत अर्ज सादर केला आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत खरेदी खत, प्रस्तावित बांधकाम नकाशा इत्यादी सोबत जोडले आहे. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :प्रस्तुतकार -१/बांधकाम/नां.पेठ / २२२८/२०१६ दिनांक २९.११.२०१६ नुसार सहायक संचालक नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग अमरावती यांना पत्र देण्यात आले.

त्यानुसार सहायक संचालक नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग शाखा कार्यालय, अमरावती यांचे पत्र जा.क्रमांक बां.प../मौ.नांदगांव पेठ./ता.व जि.अम./स.नं. १७/संसंनर-अम/५४६/ अमरावती, दि.११.४.२०१७ नुसार पत्रातील अटी व शर्तीनुसार बांधमास शिफारस केलेल्या पत्राची मुळ प्रत व बांधकाम अभिन्यासाच्या मंजूरीच्या शिफारस प्रती प्राप्त झाल्या आहे.

त्याअन्वये सहायक संचालक नगर रचना (मुल्यनिर्धारण विभाग) अमरावती यांनी वरील पत्रान्वये खालील अटी व शर्तीसह नाहरकत दिलेली आहे.

१) जागेचे मालकी हक्काबाबत अर्जदार यांनी महसूल विभागास खातरजमा करुन द्यावी.

२) विषयांकित बांधकाम नकाशांची छाननी प्रस्तावासोबत उपलब्ध असना-या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे. (उदा. ७/१२ उतारा, नकाशा, अभियंत्याचे अनुज्ञाप्ती पत्र इत्यादी) या कागदपत्राच्या अधिकृततेबाबत व अद्यावत नोंदीबाबत महसूल विभागास विकासक / जमीन मालक

..२/-

यांनी खातरजमा करुन द्यावी.

३) प्रादेशिक योजना, क्षेत्रासाठी शासनाच्या नगर विकास विभागाचे दिनांक २१.११.२०१३ पासून लागू केलेल्या प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र ६.२.११

नुसार उपरोक्त क्षेत्रासाठी सुरक्षा अनामत ठेव जमा करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. तथापी याबाबतचे दर व कार्यपध्दती अद्याप शासनाकडून विहीत करण्यात आलेली नाही. त्यामूळे संबंधित अर्जदार/मिळकत धारक/विकासकर्ते यांचे कडून बंधपत्र बांधकाम नकाशा मंजूरीपूर्वी सादर करुन घेण्यात यावे. सदर बंधपत्र अर्जदार /मिळकत धारक / विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील.

४) प्रस्तुत बांधकाम नकाशांना आपणांकडून मंजूरी अदा केल्यानंतर व बांधकाम परवानगी दिल्यानंतर सदर परवानगी दिल्यानंतर सदर पारवानगी ही एक वर्षाकरीता वैध राहील.

५) आपणांकडून देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीप्रमाणे बांधकाम सूरु असल्याची तपासनी नियमाप्रमाणे वेळोवेळी महसूल विभागास करुन देण्यात यावी तव्द्तच जोता तपासनी व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अर्जदार / भुखंडधारक / विकासकर्ते यांचेकवर बंधनकारक राहील.

६) अकृषक परवानगी व भुखंड एकत्रिकरणाचे आदेशातील अटी / शर्ती अर्जदार / भुखंडधारक / विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहतील.

७) मंजूर प्रादेशिक योजना, अमरावती करीता लागु असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीप्रमाणे बांधकाम करणे व विषयांकित मंजूर वापराकरीताच सदर बांधकामाचा वापर करणे अर्जदार/मिळकतधारक विकासकर्ते यांचेसह सर्वसंबधितावर बंधनकारक राहील.

८) मंजूर नकाशाप्रमाणेच बांधकाम करण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार / भुखंडधारक / विकासकर्ते यांचेवर राहील अन्यथा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे अनधिकृत बांधकामावर रितसर कारवाई करण्यात येईल.

९) आजुबाजुचे वहीवाटीला बाधा होणार नाही, याची दक्षता अर्जदार / भुखंडधारक / विकासकर्ते यांनी घेणे बंधनकारक राहील.

१०) महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार व मा.जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तुतचे बांधकाम करतांना छतावरील पावसाचे पाणी संकलन करुन त्याचे जमीनीमध्ये पूनर्भरण करण्याचे प्रकल्पाचे (Rain Water Harvesting) बांधकाम करणे अर्जदार /भुखंडधारक / विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील.

११) सौर उर्जेवर पाणी तापविने व अग्नीशमन व्यवस्था प्रस्तावित उदवाहिनी इत्यादी बाबी विकसीत करणे अर्जदार, भुखंडधारक / विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील. व त्या भोगवटा प्रगाणपत्र घेणेपूर्वी वापर योग्य विकसीत करणेही त्यांचेवर बंधनकारक राहील. या सुविधा वापरना-या सर्व संबधितावर उक्त सुविधा विकसीत झाल्यानंतर व वापरात आल्यानंतर सुस्थितीत व वापरात ठेवणे आवश्यक व बंधनकारक राहील.

१२) बांधकाम नकाशातील गणितीय चुका या जागेवर बांधकाम, नकाशावर नमुद केल्याव्यतीरिक्त जादा बांधकाम असल्यास त्यास संबधित देखरेख करणारे वास्तुशिल्पी व अर्जदार / विकासक /भुखंडधारक जबाबदार राहील.

१३) प्रस्तावासोबतच्या उपलब्ध कागदपत्राच्या आधारे या कार्यालयाने मंजूरीची शिफारस केली आहे. सदरहू कागदपत्र बोगस वा दिशाभूल करणारी असल्यास त्याचप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर बांधकाम केले असल्यास सदरची शिफारस रद्द समजन्यात येईल.

...३/-

उपविभागीय अधिकारी अमरावती

construction ORDER

१४) शासनाच्या विविध स्वरुपाचा कामगार कल्याण उपकरासह अन्य करांचा भरना सक्षम प्राधिकारी यांचे कडे करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

अर्जदार यांनी सादर केलेला अर्ज, मालकी हक्काबाबतची पुरावे, अकृषक आदेश, सहायक संचालक नगर रचना अमरावती यांनी दिलेले नाहरकत तसेच बांधकामाबाबतचे नकाशांना

दिलेल्याशिफारशीनुसार त्यांच्या पत्रातील अटी व शर्तीवर उपरोक्त नमुद मौजे नांदगांवपेठ,ता.जि. अमरावती येथील शेत सर्वे नं. १७,मधील अकृषक जमीनीवरील प्लॉट क्रमांक १-ए क्षेत्रफळ १३५.२९ चौ.मि., प्लॉट क्रमांक १-बी २-अे क्षेत्रफळ २७३.८० चौ.मि., प्लॉट क्रमांक २-बी क्षेत्रफळ १३६.९० चौ.मि., प्लॉट क्रमांक ३-ए क्षेत्रफळ १३६.९० चौ.मि., प्लॉट क्रमांक ८-ए, ८- बी क्षेत्रफळ २७३.८९ चौ.मि., प्लॉट क्रमांक ७-ए, ७- बी क्षेत्रफळ २७३.८० चौ.मि., प्लॉट क्रमांक ६-बी क्षेत्रफळ १३६.९० चौ.मि.,एकुण क्षेत्रफळ १३६७.४८ चौ.मि.,जागेवर एकुण १६३९.५३ चौ.मि. बांधकाम करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

स्वा/-
**उपविभागीय अधिकारी,**
**अमरावती.**

**प्रतिलीपी :**

१. मा.जिल्हाधिकारी अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. तहसिलदार अमरावती.
३. उपअधिक्षक, भूमी अभिलेख अमरावती यांना माहिति व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४. तलाठी मौजे नांदगांवपेठ ता.जि.अमरावती.
५. अर्जदार: नमन बिल्डींग मटेरियल्स प्रा.लि.तर्फे संचालक सौ. कविता सर्वेश अग्रवाल, रा.चौधरी चौक, कॉलेज रोड, अमरावती ता.जि..अमरावती नविन नाव नमन वेन्चर्स प्रा.लि. तर्फे संचालक सौ. कविता सर्वेश अग्रवाल, रा.चौधरी चौक, कॉलेज रोड, अमरावती ता.जि..अमरावती.

**उपविभागीय अधिकारी,**
**अमरावती.**

उपविभागीय अधिकारी अमरावती